<table>
<tr><td rowspan="4">MHYA060004522025</td><td>प्राप्त दिनांक.</td><td>:</td><td>०४/०८/२०२५</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक.</td><td>:</td><td>०४/०८/२०२५</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक.</td><td>:</td><td>३१/०७/२०२६</td></tr>
<tr><td>कालावधी</td><td>:</td><td>वर्षे महिने दिवस<br>०० ११ २७</td></tr>
<tr><td></td><td><u>प्रदर्श</u></td><td>:</td><td><u>१८</u></td></tr>
</table>

**प्रपत्र क्र. ३२**

**भाग 'क'**

[फौजदारी हस्तपुस्तीकेचे प्रकरण ६ वे परिच्छेद क्र.४४(१)]

<table>
<tr><td></td><td>विशेष न्यायाधीश<br>[ लै.अ.बा.सं. अधिनियम अंतर्गत ]<br>दारव्हा यांचे न्यायालयात.<br>संजीवकुमार रामदास नरवाडे यांच्या समक्ष<br>(विशेष खटला क्र. ६४/२०२५)</td></tr>
<tr><td></td><td>[प्रथम खबरी अहवाल क्र.२९४/२०२५ शिक्षाधीन कलमे १३७(२), ६४, ६४(२)(झ), ६४(२)(ठ), ६५(१) आणि ९६ भारतीय न्याय संहिता आणि कलम ४ आणि ६ लैंगीक अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वये]</td></tr>
<tr><td>अभियोग पक्ष</td><td>महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे आर्णी, जिल्हा यवतमाळ.</td></tr>
<tr><td>अभियोग पक्षामार्फत</td><td>श्री अमोलकुमार राठोड, विशेष सरकारी अभियोक्ता.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| **आरोपी** | **उमेश सुरेश घोडेकर,**<br>वय – २६ वर्षे, धंदा – मजुरी,<br>रा.– पाभळ, तालुका– आर्णी,<br>जिल्हा–यवतमाळ. |
| **आरोपी मार्फत,** | विधिज्ञ – श्रीमान पी. व्ही. चौधरी. |

**भाग 'ख'**

[फौजदारी हस्तपुस्तीकेचे प्रकरण ६वे परिच्छेद क्र.४४(२)]

| | |
|---|---|
| अपराध दिनांक | १४/०४/२०२५ |
| प्रथम खबरी अहवाल दिनांक | १५/०४/२०२५ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | ३०/०७/२०२५ |
| दोष विरचीत करण्याचा दिनांक | २४/०६/२०२६ |
| संपरिक्षा सुरु होण्याचा दिनांक | ३०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | ३०/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ३१/०७/२०२६ |
| आरोपीला शिक्षा झाली असल्यास, तो दिनांक | निरंक |

## आरोपीचे विवरण

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जामीनवर सुटल्याचा दिनांक | अपराध | आरोपीला शिक्षा झाली आहे अथवा त्याला निर्दोष मुक्त केले | शिक्षेचे स्वरुप | आरोपी कलम ४२८ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये शिक्षेमधुन वजावट मिळण्यास केंव्हापासुन केंव्हापर्यंत पात्र आहे |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (०१) | उमेश सुरेश घोडेकर. | ०५/०६/२०२५ | १८/०८/२०२५ | शिक्षाधीन **कलमे** १३७(२), ६४, ६४(२)(झ), ६४(२)(ठ), ६५(१) आणि ९६ भारतीय न्याय संहिता आणि **कलम ४** आणि **६** लैंगीक अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम, अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(आज दिनांक ३१ जुलै, २०२६ रोजी पारित)

अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द शिक्षाधीन **कलमे १३७(२), ६४, ६४(२)(झ), ६४(२)(ठ), ६५(१)** आणि **९६** भारतीय न्याय संहिता आणि **कलम ४** आणि **६** लैंगीक अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वयेच्या गुन्ह्याकरीता खटला दाखल केला आहे.

२. खटल्याची थोडक्यात पार्श्वभुमी अशी की, फिर्यादी अनिता **(अभि.साक्षी.क्र.२–प्रदर्श ०९)** ही तिची पिडीता अबक मुलगी **(अभि.साक्षी.क्र.२–प्रदर्श १२)** (पिडीतेचा नामोशेष ओळख तिची उघड न व्हावी म्हणून, न्यायनिर्णयामध्ये करण्यात आलेला नाही), तिचे पती व तिच्या लहान मुलींसह, ग्राम पाभळ, ता. आर्णी, जि. यवतमाळ येथे राहत होती. दिनांक १४/०४/२०२५ रोजी सकाळी ०८:०० वाजता फिर्यादी ही शेतात कामाला गेली होती. त्यावेळेस, तिची पिडीता मुलगी व लहान मुलगी ह्या घरी होत्या. त्यादिवशी दुपारी अंदाजे ०१:०० वाजता फिर्यादी शेतातून परतल्यानंतर, तिला तिची लहान मुलगी घरी होती, पण तिची पिडीता मुलगी घरी नव्हती. त्यामुळे, फिर्यादीने तिच्या लहान मुलीला, पिडीता कुठे गेली असे विचारले असता, तिच्या लहान मुलीने तिला असे सांगितले की, ती शेतात कामाला गेल्यानंतर,

ती सुध्दा अंदाजे ०८:३० वाजता किराणा दुकानात गेली होती. तिने तिला पुढे असे सांगितले की, ती दुकानातून, परत आल्यानंतर, पिडीता घरी नव्हती. फिर्यादीला ही माहिती मिळाल्यानंतर, तिने व तिच्या लहान मुलीने पिडीतेचा शेजारी व नातेवाईकांकडे तिचा शोध घेतला, पण ती आढळून आली नाही. त्यानंतर, फिर्यादीला अशी माहिती मिळाली की, आरोपी हा सुध्दा गावात नाही. त्यावरुन, फिर्यादीला अशी शंका आली की, आरोपीनेच तिच्या पिडीता मुलीचे अपनयन केले असावे. त्यामूळे, फिर्यादीने आरोपीविरुध्द पोलिस ठाणे, आर्णी येथे फिर्याद **(प्रदर्श–१०/अभि.साक्षी.२)** दिली. त्याआधारे, आरोपीविरुध्द शिक्षाधीन **कलमे १३७(२)** भारतीय न्याय संहिता अन्वेयचा अपराध गुन्हा क्र. २९४/२०२५ अन्वये नोंदविला.

३. गुन्हे अन्वेषण अधिकारी श्रीमान कपिल म्हस्के, पोलीस उप–निरीक्षक, आर्णी यांनी गुन्ह्याच्या अन्वेषणास सुरुवात केली. त्यांनी ज्या ठिकाणावरुन, पिडीतेचे अपनयन झाले होते, त्या घटनास्थळाला भेट देवून, पंच साक्षीदारासमक्ष घटनास्थळ पंचनामा **(प्रदर्श १३/अविवादीत दस्त)** तयार केला. त्यांनी साक्षीदारांचे बयाने त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. त्यानंतर, त्यांनी पिडीतेचा शोध घेतला असता, त्यांना अशी माहिती मिळाली की, पिडीता व आरोपी हे नरोली, सिल्वहासा, दादरा नगर हवेली याठिकाणी एका किरायाच्या घरात राहत आहे. त्यामुळे, त्यांनी त्याठिकाणी भेट दिली असता, त्यांना तेथे आरोपी व पिडीता आढळून आले. त्यांनी त्या घटनास्थळाचा, पंच साक्षीदारासमक्ष घटनास्थळ पंचनामा **(प्रदर्श १४/अविवादीत दस्त)** तयार केला. त्यानंतर, त्यांनी आरोपी आणि पिडीतेला आर्णी येथे आणले. त्यानंतर, त्यांनी आरोपीला अटक करुन, पंच साक्षीदारासमक्ष अटक पंचनामा **(प्रदर्श १६/अविवादीत दस्त)** तयार केला.

४. गुन्हे अन्वेषण अधिकारी यांनी पिडीतेला आर्णी पोलीस ठाणे येथे आणल्यानंतर, तिचे बयान श्रीमती स्वाती वानखडे, पोलीस उप–निरिक्षक, पोलीस

ठाणे, आर्णी यांच्या मार्फत तिच्या फिर्यादी आई समक्ष नोंदवून घेतले. पिडीतेने असे कथित केले की, ती १५ वर्ष ११ महिन्यांची असून, तिचे आरोपीसोबत प्रेम संबंध असल्याने, त्यांनी पळून जावून, लग्न करण्याचे ठरविले होते. तिने पुढे असे कथित केले की, दिनांक १४/०४/२०२५ रोजी सकाळी ०८ः३० वाजता तिची फिर्यादी आई शेताकडे कामाला गेली असता, ती गावाबाहेर आली, त्याठिकाणी तिला आरोपी भेटला व त्यांनी पळून जाण्याचे ठरविले. तिने पुढे असे कथित केले की, ती गावातून ऑटोन आर्णीला आली व त्याठिकाणावरुन बसने नेर व तेथून अमरावती येथे गेली. तिने पुढे असे कथित केले की, अमरावती येथून ती आणि आरोपी टॅव्हल्स बसने सिल्वासा, दादरा नगर हवेली येथे गेले व त्याठिकाणी किरायाची रुम घेवून, पती–पत्नी म्हणून राहू लागले. तिने पुढे असे कथित केले आहे की, त्याठिकाणी आरोपीने तिच्यासोबत वारंवार शारिरिक संबंध प्रस्थापित केले आहे.

**५.** पिडीतेच्या बयानाआधारे गुन्हे अन्वेषण अधिकारी यांनी आरोपीविरुध्द शिक्षाधीन **कलमे १३७(२), ६४, ६४(२)(झ), ६४(२)(ठ), ६५(१)** आणि **९६** भारतीय न्याय संहिता आणि **कलम ४** आणि **६** लैंगीक अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम, २०१२ या गुन्हयाची वाढ केली. तदनंतर, त्यांनी इतर साक्षीदारांचे बयाणे त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविली. त्यांनी पिडीतेची वैद्यकिय अधिकारी, शासकिय रुग्णालय, यवतमाळ यांच्या मार्फत वैद्यकिय तपासणी करुन घेतली व तशा आशयाचा वैद्यकिय अहवाल प्राप्त केला व अन्वेषणांती आरोपीविरुध्द शिक्षाधीन **कलमे १३७(२), ६४, ६४(२)(झ), ६४(२)(ठ), ६५(१)** आणि **९६** भारतीय न्याय संहिता आणि **कलम ४** आणि **६** लैंगीक अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वयेच्या अपराधाकरिता दोषारोप पत्र या न्यायालयात दाखल केले.

६. मी आरोपीविरुध्द शिक्षाधीन **कलमे १३७(२), ६४, ६४(२)(झ), ६४(२)(ठ)** आणि **६५(१)** भारतीय न्याय संहिता आणि **कलम ४** आणि **६** लैंगीक

अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम, २०१२ अपराधाचा दोष **प्रदर्श ०५** अन्वये विरचित केला. तो दोष आरोपीला वाचून व बोलीभाषेत समजाऊन सांगितला असता, त्याने त्याला गुन्हा कबुल नसून, त्याच्या विरुध्द संपरीक्षा चालवण्यात यावी, असे प्रतिपादन **प्रदर्श ०६** अन्वये केले. आरोपीविरुध्द दोषात्मक पुरावा नसल्याने, त्याचे **कलम ३५१** भारतिय नागरिक सुरक्षा संहिता अन्वयेचे बयान नोंदवण्यात आले नाही. आरोपीने त्याने काहीही केले नसून, त्याला खोट्या गुन्ह्यात गोवले आहे, असा बचाव स्वीकारला.

**७.** माझ्या विचाराधीन असलेल्या मुद्यांवर, मी माझे निष्कर्ष खालील प्रमाणे कारणांसह देत आहेः–

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| ०१) आरोपीने अज्ञान फिर्यादी हिला तिच्या आईवडीलांच्या कायदेशीर रखवालीतून नेवून, तिचे अपनयन केले, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ..... नाही. |
| ०२) आरोपीने पिडीतेवर बलात्कार केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | ..... नाही. |
| ०३) आरोपीने अज्ञानपणाने संमती देण्यास असमर्थ असलेल्या पिडीतेवर बलात्कार केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | ..... नाही. |
| ०४) आरोपीने पिडीतेवर वारंवार बलात्कार केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय? | ..... नाही. |
| ०५) आरोपीने अज्ञान पिडिता जिचे वय १६ वर्षाखालील आहे तिच्यावर बलात्कार केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ..... नाही. |

| | | |
|---|---|---|
| ०६) | आरोपीने अज्ञान फिर्यादी हिच्यावर लैंगिक हमला केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ..... **<u>नाही.</u>** |
| ०७) | आरोपीने अज्ञान पिडिता हिच्यावर वारंवार लैंगिक संबंध प्रस्थापीत करुन, गंभीर स्वरुपाचा लैंगिक हमला केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ..... **<u>नाही.</u>** |
| ०८) | आदेश काय आहे ? | ..... **<u>आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.</u>** |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दे क्रमांक ०१ ते ०७ करिताः–</u>

८. हे मुद्दे परस्पर संबंधित असल्याने, त्याच्यावर एकत्रित विचारमंथन करण्यात येत आहे. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने केवळ पिडीता व तिची फिर्यादी आई अनिता **(अभि.साक्षी.१)** यांचे पुरावे नोंदविले. त्याचप्रमाणे, पिडीतेच्या पुराव्यात असे आले आहे की, घटनेनंतर दोन ते तीन महिन्यांनी तिच्या वडीलांचे निधन झाले आहे. त्यामुळे, अभियोग पक्ष पिडीतेच्या वडीलाची साक्ष नोंदवू शकत नाही. फिर्यादी आणि पिडीतेने शपथेवर संपूर्ण घटना अमान्य केली आहे. त्यांनी शपथेवर असे कथीत केले आहे की, आरोपीने तिचे अपनयन केले नव्हते. त्याचप्रमाणे, पिडीतेने शपथेवर असे सुध्दा कथन केले आहे की, आरोपीने तिच्यासोबत लैंगिक संबंध प्रस्थापीत केले नाही.

९. विशेष सरकारी अभियोक्ता यांनी पिडीता आणि फिर्यादी यांना उलट–तपासणी करुन आरोपीविरुध्द पुरावा आणण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा काहीही

उपयोग झाला नाही. पण पिडीता व फिर्यादी याच कथनावर कायम राहील्या की, आरोपीने पिडीतेचे अपनयन केले नाही व तिच्या सोबत लैंगिक संबंध प्रस्थापीत केले नाही. त्यांच्या उलट–तपासणीमध्ये अभिलेखावर असे आले आहे की, पिडीतेचे इतरत्र लग्न झाले असून, ती तिच्या पतीसोबत आनंदी जिवन जगत आहे. पण या दोन्ही साक्षीदारांनी हे अमान्य केले आहे की, त्यामुळे, ते आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. अशा स्वरुपाची बाब अभिलेखावर आली असती तरीही, असे गृहित धरात येणार नाही की, पिडीतेसोबत घटना घडली होती, पण तिचे इतरत्र लग्न झाल्याने, ती आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**१०.** अभियोग पक्षाने पिडीता आणि फिर्यादी यांच्याशिवाय इतर साक्षीदारांच्या साक्षी नोंदविल्या नाही. पण अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांच्या साक्षी नोंदविल्या असत्या, आणि त्यांनी अभियोग पक्षास पुष्ठी देणा–या साक्षी दिल्या असत्या, तरीही त्याचा काहीही उपयोग झाला नसता, कारण जिच्या कायदेशीर रखवालीतून पिडीतेचे तथाकथीत अपनयन झाले होते, तिच अभियोग पक्षास पुरक साक्ष देत नाही. त्याचप्रमाणे, जिचे तथाकथीत अपनयन होवून, जिच्या सोबत लैगिंक संबंध प्रस्थापीत झाले आहेत, ती सुध्दा अभियाग पक्षास पुरक साक्षी देत नाही. त्यामुळे, इतर साक्षीदारांचा पुरावा गौण ठरतो. म्हणून, अशा परिस्थितीत इतर साक्षीदारांचा पुरावा नोंदविला अथवा नोंदविला नाही, यावरुन प्रस्तुत खटल्याच्या निकालावर कोणताही परिणाम होत नाही. आरोपीविरुध्द अभिलेखावर यत्किंचीत सुध्दा पुरावा नाही. म्हणून,अशा परिस्थितीत, मी **मुद्दे क्रमांक ०१** ते **०७** ची उत्तरे नकारार्थी देतो.

**मुद्दा क्रमांक ०८ करिताः–**

**११.** आरोपीचा गुन्हा सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयक्षी ठरला आहे. त्यामुळे, आरोपी निर्दोष सुटकेस पात्र आहेत. गुन्हे अन्वेषणादरम्यान गुन्हे अन्वेषण अधिकारी

यांनी आरोपी व पिडीतेचे कपडे जप्त करण्यात आले होते, जे की मुल्यरहीत आहेत. त्यामुळे, माझ्या मते, ते कपडे अपिलाची मुदत संपल्यानंतर नाश करणे न्याय व योग्य होईल. म्हणून, अशा परिस्थीतीत, मी **मुद्दा क्रमांक ०८** च्या उत्तरार्थ आदेश पारित करतोः–

## आदेश

(०१) आरोपीला शिक्षाधीन **कलमे १३७(२), ६४, ६४(२)(झ), ६४(२)(ठ)** आणि **६५(१)** भारतीय न्याय संहिता आणि **कलम ४** आणि **६** लैंगीक अत्याचारापासुन बालकाचे संरक्षण अधिनियम, २०१२ अन्वयेच्या गुन्ह्याच्या अपराधातून **कलम २५८(१)** भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

(०२) आरोपीचे जामीनमुचलके रद्द करण्यात आले असून, त्याला बंधमुक्त करण्यात आले आहे.

(०३) पिडीता आणि आरोपीचे जप्त कपडे अपिलाची मुदत संपल्यानंतर, नाश करावेत.

(०४) आरोपीने **कलम ४८१** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये रक्कम ₹ ३०,०००/– (तीस हजार) चा जामीन द्यावा, जो की, उभय पक्षांनी अपील दाखल करेपर्यंत अथवा पुढील सहा महिन्यापर्यंत, यापैकी जी घटना पुर्वी घडेल तोपर्यंत वैध राहील.

Digitally signed by SANJIVKUMAR RAMDAS NARWADE
Date: 2026.07.31 12:34:07 +0530

**(सं. रा. नरवाडे)**
विशेष न्यायाधीश,
(लैं.अ.बा.संरक्षण अधिनियम अन्वये)
**दारव्हा.**

**दिनांकः**- ३१/०७/२०२६

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. न्यायनिर्णय फाईल मधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | .. | **आर. ए. बेंडे,**<br>लघुलेखक – श्रेणी १ |
| न्यायालयाचे नाव | .. | **संजीवकुमार रा. नरवाडे,**<br>(विशेष न्यायाधीश, बा.लै.गु.सं. अधिनियम अंतर्गत) दारव्हा. |
| निकाल दिनांक | .. | ३१/०७/२०२६ |
| पिठासीन अधिका-याने निकालपत्रावर सही केल्याचा दिनांक | .. | ३१/०७/२०२६ |
| निकालपत्र अपलोड केल्याचा दिनांक | .. | ३१/०७/२०२६ |

# परिशिष्ट

**भाग 'ग'**

[फौजदारी हस्तपुस्तीकेचे प्रकरण ६वे परिच्छेद क्र.४४(३)]

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**क. अभियोग पक्षाचे साक्षीदारः–**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अभि. साक्षी. क्र. १ | अनिता संजय राठोड. | पिडीतेची आई/फिर्यादी. |
| अभि. साक्षी. क्र. २ | अबक. | पिडीता, |

**ख. बचाव पक्षाचे साक्षीदारः–**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| .... | निरंक | ..... |

**ग. न्यायालयीन साक्षीदारः–**

| अनुक्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| .... | निरंक | ..... |

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयीन प्रदर्शांची यादी

**क. अभियोग पक्षाचे प्रदर्शः–**

| अनुक्रमांक | प्रदर्शाचा क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| १ | पी१–१०/साक्षी. क्र.१ | फिर्याद, |
| २ | पी१–११/साक्षी. क्र.१ | छापील प्रथम खबरी अहवाल, |

**ख. बचाव प्रदर्शः–**

| अनुक्रमांक | प्रदर्शाचा क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| .... | निरंक | ..... |

**ग. न्यायालयीन प्रदर्शः–**

| **अनुक्रमांक** | **प्रदर्शाचा क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| १. | प्रदर्श १३/अविवादीत दस्त | घटनास्थळ पंचनामा, |
| २. | प्रदर्श १४/अविवादीत दस्त | घटनास्थळ पंचनामा, |
| ३. | प्रदर्श १६/अविवादीत दस्त | अटक पंचनामा, |

**ग. मुद्देमाल/वस्तुः–**

| **अनुक्रमांक** | **मुद्देमाल किंवा वस्तु क्रमांक** | **स्वरुप** |
|---|---|---|
| .... | निरंक | ..... |

**(सं. रा. नरवाडे)**
दिनांकः- ३१/०७/२०२६ विशेष न्यायाधीश,
(लैं.अ.बा.संरक्षण अधिनियम अन्वये)
**दारव्हा.**